पनवेल न्यायालयाच्या इमारतीसाठी

निधी कमी पडू देणार नाही!

आमदार प्रशांत ठाकूर यांची ग्वाही

पनवेल :

येथील बहुचर्चित, महत्त्वाकांक्षी न्यायालयाच्या इमारतीचे काम जवळजवळ पूर्ण होत आले असून, आमदार प्रशांत ठाकूर यांनी गुरुवारी (दि. २९) बांधकाम खात्याचे अधिकारी व पनवेल बार असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांसह या कामाची पाहाणी केली. पनवेलसाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या या प्रकल्प निधी कमी पडू दिला जाणार नाही, अशी ग्वाही आमदार ठाकूर यांनी या वेळी दिली.

पनवेल येथे अतिरिक्त जिल्हा न्यायालय मंजूर झाल्यानंतर शासनाच्या विधी व न्याय मंत्रालयाने या न्यायालयाच्या इमारतीसाठी प्रशासकीय मान्यता दिली, मात्र प्रशासकीय मान्यता मिळूनही गेली अनेक वर्षे न्यायालय इमारतीचा प्रश्न प्रलंबित होता. पनवेलसाठी मंजूर असलेल्या न्यायालयाला नवी इमारत मिळावी, यासाठी बार असोसिएशनकडून सातत्याने मागणी होत होती. आमदार प्रशांत ठाकूर यांनी बार असोसिएशनची आग्रही मागणी विचारात घेऊन संबंधित विभागाचे अधिकारी व मुख्यमंत्र्यांकडे यासंदर्भात पाठपुरावा केला. निवेदने दिली. तसेच प्रत्यक्ष भेटून पनवेल न्यायालयाला नव्या इमारतीची गरज असल्याचे पटवून दिले. त्यामुळे सरकारने ही बाब गंभीरपणे घेत न्यायालयाच्या इमारतीसाठी निधी उपलब्ध करून दिला.

तळमजला अधिक एक मजला असे या इमारतीचे स्वरूप असून, त्यासाठी ७ कोटी २२ लाख, २२ हजार १८९ रुपयांच्या खर्चाची तरतूद करण्यात आली.त्यानंतर या इमारतीचे काम सुरू झाले. सध्या प्रशासकीय मान्यतेनुसार तळमजला अधिक एक मजल्याचे काम पूर्ण झाले आहे, पण जून २०१५ला नव्या इमारतीत न्यायालय सुरू करण्यासाठी फर्निचर व तदनुषंगिक कामांसाठी अधिक निधीची गरज आहे. न्यायालयाच्या इमारतीचे काम काही किरकोळ कामे वगळता पूर्ण झाले असून, इमारतीला पूर्णत्व येण्यासाठी आणखी निधीची आवश्यकता असल्यामुळे इमारतीचे काम काहीसे मंदावले होते.

या समस्येची आमदार प्रशांत ठाकूर यांनी गंभीरपणे दखल घेऊन पनवेल बार असोसिएशनचे पदाधिकारी व बांधकाम विभागाचे अधिकारी यांच्यासमवेत इमारतीची पाहाणी व चर्चा केली. पनवेल न्यायालयाच्या इमारतीसाठी मुख्यमंत्री, तसेच न्याय व विधी खात्याच्या मंत्र्यांशी चर्चा करून इमारतीसाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही, अशी ग्वाही आमदार ठाकूर यांनी दिली.

या वेळी पनवेल बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. मदन गोवारी, ॲड. एम. एन. पाटील, ॲड. संदीप जगे, सचिव ॲड. खोपकर, ॲड. धनराज कोळी, ॲड. चेतन जाधव, बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता कांबळे व इतर अधिकारी उपस्थित होते.

आ. प्रशांत ठाकूर यांच्यामुळे कामाला गती : ॲड मदन गोवारी

पनवेल येथील अतिरिक्त जिल्हा न्यायालय इमारतीला मान्यता मिळाल्यानंतर अनेक वर्षे कामाचा शुभारंभ होत नव्हता. पनवेल न्यायालयाच्या स्वतंत्र वास्तूची गरज विचारात घेऊन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या अथक पाठपुराव्यामुळे निधीची तरतूद झाली व इमारतीचे काम वेगाने सुरू झाले. तळमजला अधिक एक मजला अशा स्वरूपातील सर्व सुविधायुक्त इमारत आता जवळजवळ पूर्ण झाली आहे. उर्वरित कामांसाठी निधी अपुरा पडत असल्याने हे काम रेंगाळले. याबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांच्याशी चर्चा केल्यानंतर त्यांनी बार असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांसह कामाची पाहाणी करून अधिकाऱ्यांशी चर्चा केली. तसेच इमारत पूर्ण करण्यासाठी मुख्यमंत्री, विधी व न्याय खात्याच्या मंत्र्यांशी चर्चा करून पुढच्या अडचणींवर तोडगा काढण्याचे आश्वासन दिले आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पाठपुराव्याने हे काम पूर्ण होऊन पनवेलकरांना लवकरच परिपूर्ण न्यायालयाची इमारत मिळेल, अशी आशा पनवेल बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. मदन गोवारी यांनी व्यक्त केली.